# शिवाजीविद्यापीठ,कोल्हापूर

## परिपत्रक

कै. बॅ. पी. जी. पाटील व कै. प्राचार्या श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सन १९५२ पासून शिक्षण क्षेत्रात बहुमूल्य योगदान दिलेले आहे. या दोघांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी व त्यांचा आदर्श समोर ठेवून त्यागी व तळमळीचे शिक्षक / शिक्षिका निर्माण व्हाव्यात हा हेतू मनात ठेवून कर्मवीर इन्स्टिटयूट ऑफ इंग्लिश, सातारा ही संस्था शिवाजी विद्यापीठा अंतर्गत संलग्न महाविद्यालयातील / मान्यता प्राप्त संस्थेतील आदर्श शिक्षक / शिक्षिकेस अनुक्रमे "कै. बॅ. पी. जी. पाटील व कै. प्राचार्या श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील पुरस्कार "शिवाजी विद्यापीठामार्फत प्रत्येक वर्षी विद्यापीठाच्या वर्धापन दिनी प्रदान करते. पुरस्काराचे स्वरुप प्रत्येकी रु.५००१/-प्रदान करणे असे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करिता सदर पुरस्काराची निवड करण्यासाठी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील शिक्षक / शिक्षिकेची माहिती विचारात घेतली जाणार आहे. तसेच या पुरस्कारासाठी शिफारस करीत असताना खालील बाबी विचारात घेण्यात येतील.

१. पुरस्कारासाठी पात्र शिक्षक हा शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यापीठ मान्यता प्राप्त नियमित शिक्षक असावा. तो किमान पीएच.डी. अर्हताधारक असावा. तसेच पुरस्कारासाठी पात्र होण्यासाठी संलग्न महाविद्यालयातील अद्यापनाचा किमान १० वर्षाचा अनुभव असावा.
२. शिक्षकाने आपली गुणवत्ता वाढविण्यासाठी स्वत:च्या विषया संबंधीचे संशोधन प्रकल्प, लेख, संशोधनपर लेख, ग्रंथलेखन, क्रमिक पुस्तकाचे लेखन त्यांच्या विषया संबंधिची व्याख्याने, चर्चासत्रे / अधिवेशनात लेख सादरीकरण इत्यादी केलेले असावे.
३. सदर शिक्षक आपले अध्यापनाचे व मूल्यमापनाचे काम नियमित पणे करत असले पाहिजेत.
४. आपला विषय व विषयातील इतर सहकारी शिक्षकांच्या संबंधित उपक्रमात सहभाग, क्रमिक पुस्तकांचे लेखन, विषय शिक्षकांच्या संघटनेची शैक्षणिक कारणासाठी बांधणी करणारा असावा.
५. आपल्या विषयातील अद्ययावत व नवीन प्रवाहांची माहिती त्यांना असावी. त्याअनुषंगाने विषयाचे ज्ञान अद्ययावत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला असला पाहिजे.
६. महाविद्यालयाच्या परिसरातील व समाजातील लोकांच्या समस्यांची माहिती त्यांना असावी व त्या सोडविण्यासाठी यथाशक्ती सहभाग असावा.
७. विद्यार्थ्यांना शिकवित असताना त्यांच्या सर्वांगींण विकासाकडे ही लक्ष असावे. विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर महाविद्यालयात राबवत असलेल्या इतर उपक्रमात भाग घेण्यास प्रोत्साहन दिले असले पाहिजे.
८. प्रस्तावासोबत Self Appraisal ची प्रत प्राचार्यांनी पाठवावी. तसेच प्रस्ताव पाठवितांना Self Appraisal चे एकूण गुणांकण कळवावे.
९. पुरस्कारासाठी आवश्यक असलेल्या निकष व त्याकरीताच्या गुणांकणापैकी किमान ५०% गुण प्राप्त असलेल्या शिक्षकांना सदर पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येईल.
१०. पुरस्कार मिळणाऱ्या व्यक्तिचे समाजातील स्थान, इ. बाबी विचारात घेवून पुरस्कार देण्याचा हक्क समितीकडे राखून ठेवला आहे.
११. जे निकष दिलेले आहेत त्या निकषांना अनुसरूनच माहिती पाठवावी. अधिकची माहिती पाठवून नये.

उपरोक्त १ ते १४ मुद्दे विचारात घेऊन सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात गुणांकन करुन जास्तीत जास्त गुण असणा-या एक शिक्षक व एका शिक्षिकेचे नाव प्राचार्यांच्या योग्य त्या शिफारशीसह संबंधित शिक्षकांचा सविस्तर बायोडेटासह माहिती उपकुलसचिव, संलग्नता विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे **दि.२०/१०/२०२१** पूर्वी पाठवून सहकार्य करावे. सदरचा प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी. या सर्व प्रक्रियेत निवडसमितीचा निर्णय अंतिम राहील. महाविद्यालयातील प्राचार्यांनी व यापूर्वी सदरचा पुरस्कार ज्यांना मिळाला आहे अशा शिक्षकांनी पुरस्कारासाठी अर्ज करु नयेत.

**सोबत वरील प्रमाणे.**

**प्रा.(डॉ) व्ही.डी.नांदवडेकर**
**कुलसचिव**

जा.क्र.संलग्नता/टे.५/ 1088 / 687
दि. 0 6 OCT 2021

**प्रति,**

**मा.प्राचार्य/संचालक सर्व संलग्न महाविद्यालये, सदरचे परिपत्रक सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणण्यासाठी अग्रेषित.**

**P.T.O**

## बॅ.पी.जी.पाटील आदर्श शिक्षक व
## प्राचार्या श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कार

१. शिक्षकाचे नांव: - २. फोन नं.:- ३. ई-मेल:-
४. महाविद्यालयाचे नांव: -
५. शैक्षणिक अर्हता: - ६. पदनाम: - ७. अनुभव : -

### सविस्तरमाहिती

| अ.क्र. | तपशील | गुण | कार्यालयीन उपयोगासाठी |
|---|---|---|---|
| १ | **संशोधन(जास्तीतजास्त ७० गुण)**<br>**अ)प्रकाशनगुण २०** (संशोधन जर्नल्स)<br>(विद्यापीठ-२गुण,राज्यस्तरीय- ३गुण,राष्ट्रीय- ५ गुण,आंतरराष्ट्रीय- ७ ) | | |
| | **ब)संशोधनप्रकल्प (२०गुण)**<br>(मायनर- ३,मेजर- ५गुण) माहिती पाठविताना मंजुरी पत्र /पत्रे व **उपयोगिता** (U.C.) पाठवावे / पाठवावीत. | | |
| | **क)संशोधनमार्गदर्शन (१५ गुण)**<br>(पीएच.डी.- ५ गुण,एम.फिल.- ३ गुण)<br>Deceleration Certificate जोडावे. | | |
| | **ड)क्रमिकपुस्तके (५गुण)**<br>(क्रमिक - ४ गुण,सह लेखकांच्या संख्येने भागून गुणांकन ठरवावे)<br>स्वयं अध्ययन, नोटस यांना गुणांकनकेले जाणार नाही. | | |
| | **इ)समीक्षण/सर्जनात्मक/संशोधन पुस्तके (१० गुण)**<br>(प्रत्येकी ५गुण) संपादित साहित्यास गुणदान केले जाणार नाही. | | |
| २ | **अध्ययन, अध्यापन, मुल्यमापन (१०० गुण)**<br>**अ)विद्यापीठ गुणवत्ता यादी (४० गुण)**<br>( मेरीट - ५ प्रति विद्यार्थी / रँक - ३ प्रति विद्यार्थी) मेरिट/रँकचे विद्यार्थी पत्र जोडावे.शिक्षकांच्या अध्यापनाच्या विषयामध्ये व त्यांच्या कार्यकाळातील विद्यार्थीच विचारात घेतले जातील. | | |
| | **ब) शिष्यवृत्ती / पुरस्कार (१५ गुण)**<br>(संबंधित शिक्षकाने प्राप्त केलेली शिष्यवृत्ती)<br>(विद्यापीठीय -३, राज्यस्तरीय- ५, राष्ट्रीय- ७, आंतरराष्ट्रीय- १० गुण)<br>फक्त शासकीय व निमशासकीय संस्था यांनी दिलेले पुरस्कार विचारात घेतले जातील. | | |
| | **क) सादरीकरण व आयोजन - (१३गुण)**<br>**अधिवेशन, चर्चासत्र व कार्यशाळा**<br>(सादरीकरण -२, बीजभाषक-३, सभाध्यक्ष -२, निमंत्रित व्याख्याता -३, समन्वयक -३, )<br>**(अग्रणी महाविद्यालय व अभ्यास मंडळांनी आयोजित केलेली कार्यशाळा, चर्चासत्र इ. साठी गुणदान केले जाणार नाही)** | | |
| | **ड) व्यावसायिक व विषयसंबंधी संघटनेतील योगदान - (१२गुण)**<br>(कार्यकारिणी सदस्य- ३, कार्यकारिणी पधाधिकारी- ५,सचिव -२, कोषाध्यक्ष -२ ) | | |
| | **इ)मूल्यमापन - (२० गुण )**<br>(महाराष्ट्र लोकसेवा आयोग-२, एम.फिल-२, पीएच.डी.-४, प्रकल्प मूल्यमापन-२, संशोधनपर लेखांचे परिक्षण - २, नॅक मूल्यांकन सदस्य - ४, विद्यापीठ अनुदान आयोग, सीएसआयआर, डीएसटी, इ. प्रस्ताव मूल्यमापन समिती सदस्य - ४ ) | | |
| ३ | **विस्तार कार्य - (३० गुण)**<br>**अ) करीअर विषयक - (१५ गुण ) (प्रत्येकी - २ गुण )**<br>विषय प्राविण्यसाठी मार्गदर्शन, स्पर्धा परिक्षेसाठी मार्गदर्शन, नोकरी विषयक मार्गदर्शन, व्यक्तिमत्व विकास, समुपदेशन इ. | | |
| | **ब ) समाजाभिमुख उपक्रम - (१५ गुण) (प्रत्येकी - २ गुण )**<br>राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी, राष्ट्रीय सेवायोजना प्रकल्प अधिकारी व सदस्य, सामाजिक कार्यातील सहभाग - (व्यसन मुक्ती, साहित्यिक चळवळ, पर्यावरणमुक्ती, आपत्ती व्यवस्थापन, तंटा मुक्ती, लेकवाचवा इ.) | | |
| | **एकूणगुण** | | |

टीप-

१. मूल्यमापन व संशोधना संदर्भातील युजीसी /संबंधित शिखरसंस्थेच्या विहीत नियमानूसार असणाऱ्या योगदानासच गुणांकन केले जाईल.
२. प्रस्ताव साध्याबांधणी स्वरुपात सादर करावा (स्पायरल).
३. प्रस्तावाच्या प्रत्येक पानांवर अनुक्रमांक घालावे. तसेच अनुक्रमणिकेत देखील पृष्ठक्रमांक नमुद करावेत.
४. प्रस्तावासोबत शिक्षकांचा ५ वर्षाचा स्वयंम: मूल्यमापन अहवाल प्राचार्यांनी साक्षांकित करुन पाठवावा.
५.प्राचार्यांनी प्रस्ताव पाठवितेवेळी वर्तनाबाबतचा स्पष्ट अभिप्राय द्यावा. प्रस्ताव पाठविते वेळी संबंधित शिक्षकाने सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती पाठवाव्यात.तसेच कागदपत्रे व्यवस्थित निशाण दर्शवावे (flagging) व तक्त्यातील क्रमांकानुसार विभाग व उपविभाग दिसतील असे निशाण दर्शवावे (flagging) वर उल्लेख करावा.
६.सदर शिक्षकांची चेंजिस इंन स्टाफ ची आडवी मान्यतेची प्रत सोबत जोडण्यात यावी.